**सामान्य प्रशासन विभाग क्र.1**

**जिल्हा परिषद, सोलापूर**

**जा.क्र.जिपसो/साप्रवि-१/कार्या-१४/भांडार/१३७०/१९ सोलापूर दि. २२/१०/२०२१**

# निविदा सुचना

जिल्हा परिषद, मुख्यालयातील कार्यरत असलेली अंतर्गत दुरध्वनी यंत्रणा (Intercom Machine + Telephone Machine) करिता वार्षिक देखभाल दुरुस्ती करार (Non Comprehensive AMC) करावयाचा असल्याने मोहोरबंद लिफाफामध्ये दरपत्रक मागविणेत येत आहे. तेव्हा इच्छुक पुरवठाधारकांनी दर व इतर सर्व समावेक्षक कर सेवा कर/वस्तु व सेवा शुल्क कर यांचा तपशीलवार उल्लेख करावा. अन्यथा प्राप्त दर हे सर्वसमावेक्षक दर धरले जातील. तसेच न्युनतम दर असलेल्या अथवा नियुक्त केलेल्या मक्तेदारास /संस्थेस सोबत जोडलेले अटी व शर्ती मान्य करणे बंधनकारक राहील.

**वार्षिक देखभाल दुरुस्ती करिता खालीलप्रमाणे दरपत्रके मागविणेत येत आहे.**

| अ.क्रं | तपशील | दर येथे नमुद करावा | इतर कर येथे नमुद करावा |
|---|---|---|---|
| १) | **जि.प मुख्यालयामधील विविध विभाग/कार्यालये येथे कार्यान्वित असलेले एकूण ८१ इंटरकॉम तसेच दूरध्वनी अनुषंगिक सर्व यंत्रणेचा वार्षिक देखभाल दुरुस्ती करार** (Non Comprehensive AMC)<br>टिप- कृपया सोबत जोडलेल्या अटी व शर्ती लक्षात घ्याव्यात | | |

सदरची दरपत्रके हे दि. २९/१०/२०२१ रोजी सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत पोहोचतील अशा बेताने बंद लिफाफ्यातुन पाठवावे व लिफाफ्यावर **दुरध्वनी देखभाल दुरुस्ती दरपत्रके** असा स्पष्ट अक्षरात उल्लेख करावा.

*स्थळ प्रतीवर स्वाक्षरी असे*

(चंचल पाटील)
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशा.)**
**जिल्हा परिषद, सोलापूर**

प्रत - १) कार्यालयीन नोटीस बोर्डावर.
२) ई-मेल आय.टी सेल -जिल्हा परिषद सोलापूर या सांकेतिक स्थळावर प्रसिध्दीसाठी.

# निविदेच्या नियम व अटी

१) पुरवठाधारकांचे/मक्तेदारांचे वस्तु व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र (GST) रजीस्ट्रेशन सट्रीफिकेट असणे आवश्यक.

२) निविदाधारकाने स्वतःच्या अटी घालून सादर केलेली निविदा मान्य करण्यात येणार नाही.

३) मक्तेदारांने जिल्हा परिषदमधील कार्यरत असलेले एकूण ८१ इंटरकॉम व तद्अनुषंगिक उपकरणे तसेच भारत संचार निगम लि. कडून प्राप्त कनेक्शन द्वारे पुढे जोडणेत आलेले EPABX कनेक्शन अशा जि.प मुख्यालयातील सर्व विभागांच्या मशीनचा यामध्ये समावेश आहे. याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

४) मक्तेदारांस दुरध्वनी देखभाल दुरुस्तीकरिता कळविले असता त्यांनी २४ तासांच्या आत येवून यंत्रणेची दुरुस्ती अथवा पाहणी करणे बंधनकारक राहील.

५) तसेच यंत्रणादुरुस्तीबाबत आवश्यक साहित्याचा/साधनांचा तपशील सामान्य प्रशासन विभाग क्रं.१ या कार्यालयास कळविणे बंधनकारक राहील व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन) यांचे सुचनेनुसार आवश्यक साहित्याचा पुरवठा करावयाचा आहे.

६) जर एखादे दुरध्वनी संबंधित साहित्य/ सामुग्री या कार्यालयाने खरेदी केली असता ती कार्यान्वित करणेची संपूर्ण जबाबदारी ही मक्तेदारांचीच राहील. त्यासाठी त्यांना कोणतेही अतिरिक्त शुल्क दिले जाणार नाही.

७) जि.प अंतर्गत दुरध्वनी देखभाल करिता दरवेळी पत्रव्यवहार करणे शक्य नसलेमुळे मक्तेदांस त्यांचेकडील भ्रमणध्वनी क्रंमांक कळविणे बंधनकारक राहील व दुरध्वनी/इंटरकॉम संबंधित बिघाड नादुरुस्तीबाबत मक्तेदारांस टेलिफोन द्वारेच कळविले जाईल. याची नोंद घ्यावी.

८) एखादे वेळी जर मक्तेदारांने विहित वेळेमध्ये काम केले नाही तर तेच काम इतर मक्तेदारांकडून करुन घेतले जाईल व होणारा खर्च हा मक्तेदारांच्या देयकांमधून कमी केला जाईल.

९) दर मान्य झाल्यास नंतर कोणत्याही प्रकारची वाढ देण्यात येणार नाही.

१०) दंडात्मक कार्यवाहीचे सर्व अधिकार उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशा.) यांना राहतील. केलेल्या कार्यवाहीचा अंतिम निर्णय पुरवठाधारकांस पाळणे बंधनकारक राहील.

११) निविदेतील अटी व शर्तीचे पालन करणे आपणास बंधनकारक आहे. निविदेतील कोणत्याही अटी व शर्तीचा आपणांकडून भंग झाल्यास पुरवठाधारकांविरुध्द प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल.

१२) नियमानुसार देयकातून शासन नियमांप्रमाणे आयकर वजा/कपात करण्यात येईल.

१३) निविदा प्रक्रियेमध्ये काही अडचणी/ त्रुटी आढळून आल्यास त्याबाबतचे सर्व अधिकार हे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशा.) यांचेकडे राखून ठेवले आहेत.

१४) पुरवठाधारकांने सदर निविदेच्या अटी व शर्ती मान्य असलेचे प्रमाणपत्र सादर करावे.

(चंचल पाटील)

*स्थळ प्रतीवर स्वाक्षरी असे*

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन)**
**जिल्हा परिषद, सोलापूर**